# STI - मुख्य परीक्षा – 2012
## पेपर 1
## मराठी व इंग्रजी

1. **खाली दिलेल्या स्पष्टीकरणाच्या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा. स्वाभिमान सोडून शरण जाणे.**
(1) दात पाडणे (2) दाती तृण धरणे
(3) दात दाखविणे (4) दाती बोट धरणे

2. **'काकांनी मला जत्रेतून एक चेंडू आणिला आणि ताईला बाहुली आणिली.' या वाक्याचा प्रकार सांगा.**
(1) संयुक्त वाक्य (2) मिश्र वाक्य
(3) गौण वाक्य (4) शुद्ध वाक्य

3. **समान अर्थाचा शब्द ओळखा –**
**'विमोचन'**
(1) मुक्ती (2) आकुंचन
(3) प्रसारण (4) संश्लेषण

4. **शब्दसमूहासाठी योग्य शब्द निवडा. 'फौजेबरोबर असलेली अवांतर माणसे'**
(1) शिपाईगडी (2) बाजारबुणगे
(3) सेवेकरी (4) भोई

5. **खालील वाक्य कोणत्या प्रकारचे वाक्य आहे?**
**'तुम्ही आता बाहेर जा.'**
(1) मिश्र वाक्य (2) शुद्ध वाक्य
(3) गौण वाक्य (4) संयुक्त वाक्य

6. **अधोरेखित शब्दाची जात ओळखा. 'कांगारू म्हणून एक सस्तन प्राणी आहे'**
(1) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय
(2) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय
(3) संकेतदर्शक उभयान्वयी अव्यय
(4) कारणदर्शक उभयान्वयी अव्यय

7. **'तुला जसे वाटेल तसे वाग,'**
**या वाक्यातील अधोरेखित वाक्य रीतीदर्शक .....वाक्य आहे.**
(1) क्रियाविशेषण वाक्य (2) विशेषण वाक्य
(3) प्रधानवाक्य (4) नामवाक्य

8. **यातील कोणते विरामचिन्ह अपसारण चिन्ह आहे?**
(1) . (2) ? (3) " " (4) –

9. **'माझ्या ग घरावरून कुण्या ग राजाचा हत्ती गेला'**
**वरील विधानात कोणती शब्दशक्ती आली आहे?**
(1) अभिधा (2) लक्षणा
(3) व्यंजना (4) गौणी सोरापा

10. **'गडी गायरानात गुरे घेऊन गेला आहे'**
**वरील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारात येतो?**
(1) सामासिक शब्द (2) अध्यस्त शब्द
(3) तत्सम शब्द (4) तद्भव शब्द

11. **खालील म्हण पूर्ण करा.**
**'श्री' च्या मागोमाग ..... येतो.**
(1) 'ज्ञ' (2) 'ग' (3) 'क' (4) 'छ'

12. **पर्यायी उत्तरातील 'तोळंबा' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द कोणता?**
(1) धष्टपुष्ट शरीर (2) तोष
(3) लंबक (4) तुळई

13. **पर्यायी उत्तरातून खालील वाक्यातील लक्षार्थ ओळखा.**
**'तो कप पिऊन टाक.'**
(1) भाकरी खा (2) भात देऊन टाक
(3) चहा पी (4) रोटी दे

14. **खालील वाक्य कोणत्या वाक्य प्रकारातील आहे?**
**'जे विद्यार्थी चांगला अभ्यास करितात ते पास होतात.'**
(1) मिश्र वाक्य (2) शुद्ध वाक्य
(3) गौण वाक्य (4) संयुक्त वाक्य

15. **खालील वाक्याचा प्रयोग सांगा.**
**'पारिजातकाची योजना करणारा कवी खरोखरच कल्पक असला पाहिजे.'**
(1) कर्तरी प्रयोग (2) भावे प्रयोग
(3) कर्मणी प्रयोग (4) संकीर्ण प्रयोग

16. **आज संपत्ती त्याजपाशी आहे.**
**या वाक्यातील मूळ उद्देश्य कोणते?**
(1) आज (2) त्याजपाशी
(3) संपत्ती (4) आहे

17. **'मरावे परी कीर्तिरूपे उरावे'**
**या वाक्यातील उभयान्वयी अव्यय कोणते?**
(1) कीर्ति (2) रूपे
(3) परी (4) उरावे

The UNIQUE academy

18. **नकारार्थी वाक्यात रूपांतर करा.**
**'गुणेशचे चित्र खराब आहे'.**
(1) गुणेशचे चित्र चांगले नाही.
(2) गुणेशचे चित्र बरे आहे.
(3) गुणेशचे चित्र साधारण नाही.
(4) गुणेशचे चित्र वाईट नाही.

19. **हल्ली सज्जन मित्र मिळणे कठीण झाले आहे.**
**अधोरेखित शब्दांचे विशेषण प्रकार ओळखा.**
(1) साधित विशेषण
(2) परिणामदर्शक विशेषण
(3) नामसाधित विशेषण
(4) अविकारी विशेषण

20. **'तो तेथेच राहिला'**
**वरील वाक्याचा प्रकार सांगा.**
(1) संयुक्त वाक्य (2) शुद्ध वाक्य
(3) मिश्र वाक्य (4) गौण वाक्य

21. **खालीलपैकी पर्यायी उत्तरांतून विसंगत जोडी ओळखा.**
(1) चोराच्या उलटया बोंबा – खोडया करून पुनः स्वतःच आरडाओरड करणे.
(2) चोरावर मोर – एका चोरापासून वस्तू उपटून नेणारा सवाई.
(3) चोराला सोडून संन्याशाला सुळी – खऱ्या अपराध्याला शिक्षा करणे.
(4) चोराच्या मनात चांदणे – वाईट कृत्य उघडकीस येईल म्हणून भीती वाटणे.

22. **खालील म्हण पूर्ण करा.**
**केळी खाता हरखले ....... देता चरकले.**
(1) हिशेब (2) पाणी
(3) दूध (4) अन्न

23. **खालील पर्यायी उत्तरांतील समानार्थी नसलेला शब्द कोणता?**
(1) ख (2) आकाश
(3) पौर्णिमा (4) अंबर

24. **'सुताराने पाळणा केला'**
**या वाक्यातील अधोरेखित शब्दास वाक्यपृथक्करणात काय म्हणतात?**
(1) मूळ उद्देश्य (2) विधेय पूरक
(3) उद्देश्य विस्तारक (4) मूळ विधेय

25. **संस्कृत शब्दात बदल होऊन आलेल्या शब्दांना ........ असे म्हणतात.**
**रिकाम्या जागी अचूक पर्याय शोधून लिहा :**
(1) तद्भव (2) तत्सम (3) देश्य (4) गुजराती

26. **पर्यायी उत्तरांतील कोणता शब्द गटाबाहेरचा आहे?**
(1) त्रिभुवन (2) त्रिदल
(3) चौघडी (4) त्रैलोक्य

27. **खालील शब्दांचे, ज्या गटात अर्थ अधिक अचूक आहेत असा गट ओळखा –**
**'कळ'**
(1) दुःख, सुख (2) कुरापत, संकट
(3) किल्ली, वेदना (4) काळजी, कळकट

28. **खालील सामासिक शब्दाचा प्रकार सांगा?**
**'प्रतिवर्षी'**
(1) तत्पुरुष समास (2) द्वंद्व समास
(3) अव्ययीभाव समास (4) द्विगू समास

29. **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**
**'आम्ही जाऊ नाहीतर राहू, तुला काय त्याचे'?**
(1) प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यय
(2) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
(3) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
(4) उद्देश्यबोधक उभयान्वयी अव्यय

30. **असे म्हणतात की,**
**'.....दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा'.**
(1) थोडी (2) अल्प (3) पै (4) शेकडो

31. **'पंचमुखी हनुमान' हे कोणते विशेषण आहे.**
(1) अव्ययसाधित विशेषण
(2) धातुसाधित विशेषण
(3) समासाधारित विशेषण
(4) संबंधीविशेषण

32. **'येथे कसा, काय प्रकार घडला, की तो मला माहीत नाही.' हे वाक्य कोणत्या प्रकारचे आहे?**
(1) गौण वाक्य (2) संयुक्त वाक्य
(3) मिश्र वाक्य (4) केवल वाक्य

33. **खालीलपैकी 'दंततालव्य' वर्ण कोणता?**
(1) र (2) ग (3) ज् (4) म्

34. **'गरज ही कल्पकतेची आई होय,' या वाक्यातील आई या शब्दाचा लक्ष्यार्थ कोणता?**
(1) माता (2) उत्पत्तीचे कारण
(3) जन्मदात्री (4) माउली

35. **पुढील पर्यायातून 'कन्नड' शब्दगट शोधा :**
(1) अण्णा, अप्पा, ताई
(2) अत्तर, इमान, खलाशी
(3) पोषाख, बगीचा, बागाईत
(4) टेबल, पोस्ट, स्टेशन

**36. पुढील वाक्यातील 'प्रयोग' ओळखा.**
**'आईवडिलांनी मुलांना मायेने वाढविले'.**
(1) कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग
(3) भावे प्रयोग (4) संकरित प्रयोग

**37. खालील वाक्प्रचार व त्याचा अर्थ यातून विसंगत जोडी ओळखा.**
(1) कास धरणे-मोठ्याच्या आश्रयाला जाणे
(2) कोंबडे झुंजविणे-भांडण लावून मजा पाहणे
(3) कळा पालटणे-रूप पालटणे
(4) कणीक तिंबणे-डोके दुखू लागणे

**38. 'चिल्ली पिल्ली' हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे?**
(1) तमीळ (2) तेलगू
(3) गुजराती (4) फारसी

**39. खाली सारख्या अर्थाच्या दोन म्हणी यांची जोडी दिली आहे त्यातील विसंगत म्हणीची जोडी ओळखा.**
(1) घोडे कमावते गाढव खाते
– घोड्याएवढे डोके गाढवाऐवढी अक्कल
(2) ओसाड रानात एरंडाचा उदोउदो
वासरात लंगडी गाय शहाणी
(3) कोठे इंद्राचा ऐरावत नि कोठे कोठे राजा भोज अन् कोठे गंगू तेली शामभटाची तटाणी
(4) गवयाचे पोर रडले तरी सुरातच रडणार – खाण तशी माती

**40. खालील संयुक्त वाक्य कोणत्या प्रकारचे आहे?**
**'सगळे काही त्याला माहीत आहे, पण लक्षात कोण घेतो?'**
(1) न्यूनत्व बोधक (2) परिणाम बोधक
(3) विकल्प बोधक (4) समुच्चय बोधक

**41. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**
**'भयंकर वादळ सुटले <u>आणि</u> पत्रे उडून गेले.'**
(1) गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यय
(2) प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यय
(3) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय
(4) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय

**42. 'पगार' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आलेला आहे? योग्य पर्याय निवडा.**
(1) गुजराती (2) पोर्तुगीज
(3) इंग्रजी (4) फारसी

**43. 'घरात जा व पाणी आण,'**
**वरील वाक्य कोणत्या प्रकारचे वाक्य आहे?**
(1) मिश्र वाक्य (2) संयुक्त वाक्य
(3) शुद्ध वाक्य (4) गौण वाक्य

**44. समानार्थी शब्द ओळखा. – अभिनिवेश**
(1) जोम (2) अभिनय
(3) अभिमान (4) प्रवेश

**45. मूळच्या शब्दांना.....म्हणतात.**
**रिकाम्या जागी अचूक पर्याय लिहा :**
(1) सिद्ध शब्द (2) साधित शब्द
(3) उपसर्ग (4) प्रत्यय

**46. 'समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत,' या वाक्यातून कोणता अर्थ प्रकट होतो?**
(1) व्यंग्यार्थ (2) वाच्यार्थ
(3) लक्ष्यार्थ (4) रूढार्थ

**47. उष:काल होता होता, काळरात्र झाली......या पंक्तीतून कोणता अर्थ व्यक्त होतो?**
(1) वाच्यार्थ (2) शब्दार्थ
(3) व्यंगार्थ (4) यापैकी नाही

**48. खालील पर्यायी उत्तरातील शुद्ध पर्यायी शब्द सांगा.**
(1) अग्नीहोत्री (2) अग्निहोत्री
(3) आग्नीहोत्री (4) आग्निहोत्री

**49. पर्यायी उत्तरांतील कोणता शब्द 'अंशाभ्यस्त विशेषण' आहे?**
(1) आगतस्वागत (2) गेलाबिला
(3) वाईटसाईट (4) उद्याबिद्या

**50. 'आपण' या सर्वनामाचा अर्थ जेव्हा 'स्वत:' असा होतो, तेव्हा ते......सर्वनाम असते.**
(1) पुरुषवाचक (2) दर्शक
(3) आत्मवाचक (4) प्रश्नार्थक

**51. पर्यायी उत्तरातील 'अ' व 'ब' या शब्दगटातून विरूद्ध अर्थी शब्द जोडी कोणती ती शोधा.**

| | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| (1) | अश्व | वाजी |
| (2) | हय | घोडा |
| (3) | अनुज | अग्रज |
| (4) | वारू | तुरंग |

**52. पर्यायी उत्तरांतील कोणता शब्द 'अव्ययअंशाभ्यस्त' शब्द आहे?**
(1) कडूबिडू (2) आगेमागे
(3) बोलणेचालणे (4) पोरसोर

**53. विशेषत: काव्याला सूचकता आणणारी व काव्य अधिक परिणामकारक ठरविणारी शब्दशक्ती कोणती? पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा.**
(1) अभिधा (2) लक्षणा
(3) व्यंजना (4) धववाणी

54. 'द्विगुणित आनंद' या शब्दातील 'द्विगुणित' शब्द..... संख्याविशेषण आहे.
(1) क्रमवाचक (2) आवृत्तिवाचक
(3) अनिश्चित (4) गणनावाचक

55. 'मौळी' या शब्दाला समानार्थी शब्द कोणता आहे?
(1) छातीचा पिंजरा (2) मस्तक
(3) मान (4) गाल

56. पर्यायी उत्तरांतून योग्य ते उत्तर सांगा?
'ईश्वरनिर्मित'
(1) नञतत्पुरुष समास (2) तृतीया तत्पुरुष समास
(3) प्रादी समास (4) कर्मधारय समास

57. पर्यायी शब्दातील 'मिठी' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
(1) आवड (2) मिती (3) तिथी (4) प्रमाण

58. पर्यायी उत्तरांतील कोणता शब्द 'नामअंशाभ्यस्त' आहे?
(1) झाडबिड (2) इकडेतिकडे
(3) निरखणेपारखणे (4) फुटकातुटका

59. पर्यायी उत्तरांतून खालील शब्दाचा विरूद्ध अर्थी शब्द सांगा. – 'विधायक'
(1) विदेशी (2) विसंगत
(3) विध्वंसक (4) विजातीय

60. खालील केवलप्रयोगी अव्ययातील आश्चर्यबोधक केवलप्रयोगी अव्यय ओळखा.
(1) अहाहा! (2) अरेरे! (3) बापरे! (4) छे छे!

61. 'नवोढा' या शब्दाला समानार्थी शब्द कोणता?
(1) कुमारिका (2) गृहिणी
(3) लेकुरवाळी (4) नववधू

62. 'अननस, बिजागरी' हे शब्द कोणत्या भाषेतून आले आहेत?
(1) पोर्तुगीज (2) कानडी
(3) तेलगू (4) फारसी

63. विशेषण ज्या नामाबद्दल, विशेष अशी माहिती सांगते त्या नामाला ....... असे म्हणतात.
(1) विशेष्य (2) अव्यय सदृश्य सर्वनाम
(3) धातुसाधित (4) अव्ययसाधित

64. खालील पर्यायी उत्तरांतून समानार्थी शब्द असलेले वाक्य सांगा.
(1) निर्मलाचे सासरमाहेर जवळच आहे.
(2) त्याने कधी पापपुण्याचा विचार केला नाही.
(3) त्यात आश्चर्यनवल वाटावयाचे काहीच कारण नाही.
(4) सुरसनिरस गोष्टी सर्वांना आवडतातच असे नाही.

65. 'तिने भिकाऱ्याला पैसा दिला,' हे वाक्य क्रियापदांच्या कोणत्या प्रकारातील आहे?
(1) विधानपूरक (2) फक्त सकर्मक
(3) द्विकर्मक (4) उभयविध

66. 'हालअपेष्टा सहन करण्याचा गुण' चा शब्दसमूहासाठी एक शब्द शोधा.
(1) तितिक्षा (2) गरीब
(3) दयाळु (4) मायाळु

67. '<u>जो मनुष्य चोरी करतो</u>, त्यास शिक्षा होते.'
या वाक्यातील अधोरेखित वाक्य कोणत्या प्रकारचे वाक्य आहे?
(1) मिश्र वाक्य (2) केवल वाक्य
(3) गौण वाक्य (4) संयुक्त वाक्य

68. 'मी नदीच्या <u>काठाने</u> गेलो'
अधोरेखित शब्दाच्या विभक्तीचा कारकार्थ ओळखा.
(1) करण (2) अधिकरण
(3) कर्ता (4) कर्म

69. संधी सोडवा, 'सदाचार'.
(1) स + दाचार (2) सदा + आचार
(3) सत् + आचार (4) सद् + आचार

70. पुढील वाक्यातील मूल–विधेय कोणते आहे?
''पूर्वी घडून आलेला आणखी एक प्रसंग सांगण्यासारखा आहे.'
(1) आणखी एक (2) प्रसंग
(3) आहे (4) सांगण्यासारखा

71. 'गुरुजी म्हणाले की, एकी हेच बळ.'
या वाक्यातील गौणवाक्य कोणते?
(1) गुरुजी म्हणाले (2) गुरुजी म्हणाले की
(3) एकी हेच बळ (4) म्हणाले की

72. 'अक्कलहुशारी' हा शब्द ....... आहे.
(1) अंशाभ्यस्त शब्द (2) पूर्णाभ्यस्त शब्द
(3) अनुकरणवाचक शब्द (4) नादानुकारी शब्द

73. ''हवा कोंदट असल्यास मनुष्याची प्रकृती बिघडते.''
वरील वाक्यातील विधेय विस्तारक कोणते?
(1) हवा कोंदट असल्यास (2) मनुष्याची
(3) प्रकृती (4) बिघडते

74. खालील पर्यायी उत्तरातील कोणत्या शब्दाला 'उपसर्ग' लावून 'क्रीडा' हा शब्द बनविला आहे?
(1) प्र + हार (2) वि + हार
(3) आ + हार (4) अप + हार

75. 'सिद्ध' शब्दचे किती प्रकार पडतात?
(1) तीन (2) दोन (3) पाच (4) चार

76. खालील म्हण पूर्ण करा.
चुलीपुढे शिपाई अन् घराबाहेर .....
(1) शिकारी (2) कसाई
(3) भागुबाई (4) गवई

77. सर्वनामाचा प्रकार ओळखा : – 'जो'
(1) पुरुषवाचक सर्वनाम (2) दर्शक सर्वनाम
(3) संबंधी सर्वनाम (4) अनिश्चित सर्वनाम

78. 'दुर्वास शकुंतलेला शाप देतो' या विधानात ..... कर्मे आहेत. रिकाम्या जागी अचूक पर्याय शोधून लिहा.
(1) एक (2) दोन (3) तीन (4) चार

79. खालीलपैकी पूर्णअभ्यस्त शब्द कोणता?
(1) बाजारहाट (2) पूजाविधी
(3) वंदनबिंदन (4) पुनः पुनः

80. पर्यायी उत्तरांतील समानार्थी शब्दगटाच्या बाहेरचा शब्द कोणता?
(1) केसरी (2) पंचानन
(3) मृगेंद्र (4) शाखामृग

81. ''या व्यंजनाची जोडाक्षरे लिहिण्याच्या किती पद्धती आहेत?
(1) एक (2) दोन (3) तीन (4) चार

82. 'छी! किती घाणेरडा आहेस तू' या वाक्यातील केवलप्रयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा.
(1) तिरस्कारदर्शक केवलप्रयोगी अव्यय
(2) शोकदर्शक केवलप्रयोगी अव्यय
(3) आश्चर्यदर्शक केवलप्रयोगी अव्यय
(4) विरोधदर्शक केवलप्रयोगी अव्यय

83. वाक्यसंश्लेषण करा.
'त्या वृद्धाला आता कोणतीही इच्छा राहिली नाही'.
(1) तो वृद्ध स्वेच्छ आहे.
(2) तो वृद्ध निरिच्छ आहे.
(3) तो वृद्ध सकाम आहे.
(4) तो वृद्ध निष्कांचन आहे.

84. पर्यायी उत्तरांतील 'अ' व 'ब' गटातील विषमार्थी जोडी कोणती?

| | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| (1) | सविता | कांचन |
| (2) | स्त्री | ललना |
| (3) | महिला | वनिता |
| (4) | नारी | अबला |

85. पर्यायी सामासिक शब्दांत गटाबाहेरचा सामासिक शब्द कोणता?
(1) नि:शब्द (2) अनेक
(3) नीरस (4) सादर

86. 'कडा' या शब्दाचे सामान्यरूप ओळखा.
(1) कडया (2) कडयावर
(3) कडयाला (4) कडयावरून

87. पर्यायी उत्तरांतून खालील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ते सांगा?
'मी खात्रीने पास होईन.'
(1) आज्ञार्थी (2) विद्यर्थी
(3) स्वार्थी (4) नकारार्थी

88. खालीलपैकी शुद्ध शब्द कोणते?
(1) चिंचा, खिंड, टिंबं (2) चींच, खींड, टिंब
(3) चिंच, खिंड, टिंब (4) चींच, खींड, टीब

89. योग्य अर्थाची म्हण शोधा.
रामजीने आपल्या नोकरांकडून भरपूर काम करून घेतले– मात्र त्याचा मोबदला खूप कमी दिला.
(1) दुरून डोंगर साजरे (2) पळसाला पाने तीनच
(3) दाम करी काम (4) वरील कोणतीही नाही

90. 'माझे पुस्तक' शब्दातील 'माझे' हा शब्द.....आहे.
(1) सार्वनामिक विशेषण (2) क्रियापद
(3) नाम (4) अव्यय

91. पर्यायी उत्तरांत धातुसाधित शब्दांतील गटाबाहेरील शब्द कोणता?
(1) वेडा (2) ठेवा (3) ठेचा (4) सुका

92. 'अरसिकाला काव्याचे परीक्षण करण्यास सांगणे हे निरर्थक आहे, उपहासास्पद आहे.'
वरील वाक्याची अचूक म्हण सांगा.
(1) गाढवाने शेत खाल्ल्याचे पाप ना पुण्य.
(2) गाढवाला गुळाची चव काय माहीत?
(3) गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता.
(4) गाढवांचा गोंधळ लाथांचा सुकाळ.

93. 'हसणे' हा मनुष्यस्वभाव आहे.
या वाक्यातील 'हसणे' हा शब्द.....आहे.
(1) धातुसाधित नाम (2) सर्वनाम
(3) विशेषण (4) क्रियापद

94. सर्वनामाचे एकूण मूळ .....प्रकार पडतात.
रिकाम्या जागी अचूक पर्याय शोधून लिहा.
(1) नऊ (2) तीन
(3) चार (4) सात

**95. खालील वाक्य कोणत्या वाक्य प्रकारातील आहे, हे पर्यायी उत्तरांतून शोधून काढा.**
**'जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला.'**
(1) नामवाक्य (2) विशेषण वाक्य
(3) क्रियाविशेषण वाक्य (4) संयुक्त वाक्य

**96. 'मला दोन मैल चालवते.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार कोणता?**
(1) प्रयोजक क्रियापद (2) संयुक्त क्रियापद
(3) शक्य क्रियापद (4) अनियमित क्रियापद

**97. 'येते' या क्रियापदात मूळ शब्द.....हा आहे.**
(1) ते (2) येते (3) ये (4) येणे

**98. ''कच्छपी लागणे'' या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ सांगा.**
(1) व्यर्थ समजूत काढणे
(2) एखाद्याच्या नादी लागणे
(3) तहान लागणे
(4) जबाबदारी दुसऱ्यावर सोपविणे

**99. पुढील शब्दाचा समास ओळखा. – 'अनंत'**
(1) नत्र बहुव्रीही समास (3) समाहार द्वंद्व-समास
(2) द्विगू समास (4) मध्यमपदलोपी समास

**100. पर्यायी उत्तरांतील उद्देशदर्शक क्रियाविशेषणाचे वाक्य कोणते?**
(1) शरीर घाटदार व्हावे म्हणून आम्ही व्यायाम करतो.
(2) जेथे जातो तेथे तू माझा सांगाती.
(3) तुला जसे वाटेल तसे वाग.
(4) जेव्हा घाम गाळावा तेव्हाच खायला भाकरी मिळते.

**101. खालील शब्दाचा समानार्थी शब्द ओळख. – 'अद्वैत'**
(1) वैर (2) ऐक्य (3) द्वंद्व (4) दुही

**102. 'वाटेत मोटार नादुरुस्त झाली म्हणून मला यावयास उशीर झाला.' वरील वाक्य संयुक्त वाक्याच्या कोणत्या प्रकारातील आहे?**
(1) समुच्चय बोधक (2) विकल्प बोधक
(3) न्यूनत्व बोधक (4) परिणाम बोधक

**103. 'तो घरी खात्रीने येईल' या वाक्याचे योग्य वाक्यरूपांतर कोणते?**
(1) तो घरी येणार नाही.
(2) तो घरी आल्याशिवाय राहायचा नाही.
(3 तो घरी यावा.
(4) तो घरी येईल असे वाटते.

**104. खाली म्हणी व त्यांचा अर्थ दिला आहे. त्यातील चुकीच्या अर्थाची जोडी ओळखा.**
(1) ओढाळ गुराला लोढणे गळ्याला – गुन्हेगाराला कायद्याचा वचक बसायलाच हवा.
(2) कानाला ठणका नाकाला औषध – दुखणे एके ठिकाणी आणि उपाय भलतीकडेच.
(3) आठ पूरभय्ये नि नऊ चौबे – सर्वांनी सहकार्य केले तर मोठे कार्य पार पडते.
(4) कुडी तशी पुडी – शरीर प्रकृतीप्रमाणे माणसाचा आहार असतो.

**105. 'विजयनगरच्या साम्राज्याचा जेथे अंत झाला' या वाक्यातील उद्देश्य कोणते?**
(1) जेथे
(2) अंत
(3) झाला
(4) विजयनगरच्या साम्राज्याचा

**106. खालील पर्यायातील योग्य पर्याय कोणता?**
**'कुणकुण लागणे'**
(1) पाय लागणे (2) हात लागणे
(3) चाहूल लागणे (4) डोळा लागणे

**107. खालील म्हण पूर्ण करा.**
**संग तसा**
(1) श्रीरंग (2) रंग (3) पांडुरंग (4) विहंग

**108. एका केवल वाक्यात रूपांतर करा.**
**'हे लोकशाहीचे युग आहे. वेळीच जागे व्हावे.'**
(1) हे लोकशाहीचे युग असल्याने वेळीच जागे व्हावे.
(2) लोकशाही युगात वेळीच जागे व्हावे.
(3) वेळीच जागे व्हावे कारण हे लोकशाहीचे युग आहे
(4) ह्या लोकशाहीच्या युगात वेळीच जागे झालेले चांगले.

**109. 'मग त्यावर आकाशातल्या पणत्या तेवत असतात.' वरील वाक्यातील विधेय विस्तार सांगा.**
(1) आकाशातल्या (2) पणत्या
(3) मग त्यावर (4) तेवत असतात

**110. 'अं व अः हे ....... आहेत.'**
(1) व्यंजनादी (2) व्यंजन
(3) स्वरादी (4) व्यंजनांत

**खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 111 ते 115 यांची उत्तरे द्या –**

एका घराचे दगड काढून दुसऱ्या घरास लावावयाचे असले तरी किती त्रास पडतो हे सर्वांस माहीत आहेच. पण हेच दगड चुन्यात पक्के बसविलेले असले तर फारच त्रास पडतो, आणि त्यांतही पहिली इमारत बांधल्यापासून बरीच वर्षे लोटली असलीं, व चुन्याचा आणि दगडांचा एकजीव होऊन गेला असला, तर एकेक दगड सोडविण्यास किती मारामार पडते, हे कोणास सांगावयाला पाहिजे असे नाही; तात्पर्य, कोणत्याही जड द्रव्यांचा संनिकट संयोग करून

त्यापासून एक पिंड केला असता तो पिंड मोडून त्याच्या घटकांचा निराळा पिंड बनविणे हे अतिशय कष्टाचे काम आहे, हे प्रत्येकाने कबूल केले पाहिजे.

सामाजिक घडामोडींचाही असाच प्रकार आहे, प्रथम व्यक्तीच्या शरीररचनेचा विचार करा. आरंभी हे शरीर समजातीय द्रव्याचे झालेले असून, पुढे ते जसजसे वाढत जाते तसतसे त्यांत विषमजातित्व उत्पन्न होते; व ज्या मानाने त्यात विषमजातित्व उत्पन्न होते त्या मानाने त्यात अधिकाधिक दाढर्य उत्पन्न होऊन बाह्य संस्कारात ते अधिकाधिक प्रतिबंध करू लागते. कोवळे वेळू, लहान झाडांच्या फांद्या किंवा तरुण मुलांचे अवयव यात किती लवचीकपणा असतो बरे? वाढ खुंटून प्रत्येक अवयवात काठिण्य आल्यावर, कोणत्याहि मनुष्यास चांगली कसरत शिकता येत नाही, ही प्रत्येकाच्या पाहण्यातली गोष्ट आहे. सामाजिक शरीरातही परिणतीमळे अशाच तव्हेचे काठिण्य उद्भूत होते. कोणताहि समाज एकदा वाढीस लागला, आणि श्रमविभागामुळे त्यास भिन्नावयवित्व प्राप्त झाले, व त्यात निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन ते निरनिराळ्या क्रिया करू लागले म्हणजे त्याचे रूपांतर करू पाहणाऱ्या गोष्टीस त्याकडून मोठा प्रतिबंध होऊ लागतो. राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार यासंबंधाने ज्या रीति एकदा रूढ होऊन जातात त्यात फिरून बदल करणे अत्यंत दुरापास्त होऊ लागते, पूर्वापार चालत आलेल्या चालीत विचारदृष्ट्या कितीहि विसंगतता दिसली तरी त्या सोडणे किती जिवावर येते हे बाल-विवाह, केशवपन, सुतक इत्यादि प्ररूढ चालीचा विचार करता, तेव्हांच लक्षात येणार आहे. समाजातील शेकडा नव्याण्णव लोकांची स्थिति अंधपरंपरेप्रमाणे असते. मळलेल्या वाटेच्या बाहेर एक पाऊल टाकल्यानेसुद्धा आपणावर मोठा भयंकर प्रसंग गुदरेल असा धाक त्यास क्षणोक्षणी वाटत असतो.

**111. उताऱ्याला योग्य शीर्षक द्या :**

(1) सामाजिक घडामोड

(2) राज्यधर्म लोकाचार

(3) शरीररचनेचा विचार

(4) बदलता समाज

**112. कोणत्या संबंधाने रीती रूढ होतात?**

(1) चालीरीतीमुळे

(2) सामाजिक संकेतामुळे

(3) रीतिभातीमुळे

(4) राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार

**113. चांगली कसरत केव्हा करता येत नाही?**

(1) व्यायाम करताना

(2) वाढ खुंटून प्रत्येक अवयवात काठिण्य आल्यावर

(3) चांगला प्रतिसाद मिळाल्यावर

(4) सामाजिक घडामोड झाल्यावर

**114. सामाजिक शरीरांमध्ये काठिण्य कशामुळे उद्‌भवते?**

(1) परिणतीमुळे (2) सामाजिकतेमुळे

(3) वादामुळे (4) घडामोडीमुळे

**115. लवचीकपणा कोणात असतो?**

(1) सामाजिक घडामोडीत

(2) शरीररचनेत

(3) बाह्यरचनेत

(4) कोवळे वेळू, झाडांच्या फांदया तरूण मुलांचे अवयव

**खालील उताऱ्यावरील प्रश्न क्र. 116 ते 120 या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

गाडगे महाराज हे महान समाजसुधारक संत होऊन गेले. दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, देवधर्म, कर्मकांड, भोळेपणा, जातपात व व्यसने यांत बुडून गेलेल्या समाजाला त्यांनी नवा मार्ग दाखवला. त्यासाठी त्यांनी केवळ भाषणबाजी केली नाही. त्यांच्या हातातील खराटा हेच त्यांचे साधन होते. गावातील गलिच्छ वस्त्या ते झाडून स्वच्छ करीत. पुढे जनमानसातील कचरा साफ करण्याचे अखंड व्रत आयुष्यभर चालवले. फुकटचे त्यांनी स्वतः कधी खाल्ले नाही व इतरांना खाऊ दिले नाही. श्रमांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. गरिबीचे मूळ अज्ञानात, व्यसनात, गलिच्छपणात व आळसात आहे हे त्यांनी लोकांना पटवले. लक्षावधी रुपये वर्गणीरूपाने जमवून त्यांनी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, पाणपोया बांधल्या व लोकहिताची कामे केली. यात्रा-मेळे यांना ते जात ते जनताजनार्दनांच्या सेवेसाठी. आंधळ्यांची, अपंगांची, रंजल्यागांजल्यांची सेवा हीच त्यांनी विठ्ठलाची भक्ती मानली. लक्षावधी रुपये जमवून त्यांतील पैचाही विनियोग त्यांनी कधी स्वतःसाठी केला नाही. पै-पैचा हिशोब ते वहीत टिपून ठेवत. ती चोपडी सदैव त्यांच्या गळ्यात अडकवलेली असे. कुणीही येऊन त्यांचे हिशोब पाहू शकत असे. त्यांचा व्यवहार कसा खुल्लमखुल्ला होता. स्वतःच्या बायकोने आजारपणात गोशाळेतील गाईचे दूध घेतले, म्हणून तशाही अवस्थेत त्यांनी तिला सबंध गोशाळा साफ करण्याची शिक्षा दिली. सार्वजनिक जीवनात आर्थिक व्यवहार सांभाळणारा मनुष्य किती स्वच्छ असावा याचा गाडगेबाबा हे एक अत्युच्च आदर्शच होते.

**116. उताऱ्यातील 'विनियोग' या शब्दाचा अर्थ –**

(1) खर्च (2) बेहिशोबी

(3) योगायोग (4) दुरुपयोग

**117. गाडगे महाराजांनी गोशाळा साफ करण्याची शिक्षा कुणाला दिली?**

(1) कन्येला (2) पत्नीला

(3) पुत्राला (4) स्वत:ला

**118. गाडगेबाबा यात्रेला का जात?**

(1) देवदर्शनासाठी इतर जातात म्हणून जात.

(2) मजा वाटावी म्हणून.

(3) लोकांच्या सेवेसाठी.
(4) केवळ भाषणे करण्यासाठी

**119. गरिबीचे मूळ कशात आहे, असे गाडगेबाबा म्हणत?**
(1) श्रीमंतांच्या शोषणात (2) अज्ञान व आळसात
(3) आर्थिक सुबत्तेत (4) राजकीय वृत्तीत

**120. गाडगे महाराजांनी कोणती विठ्ठलभक्ती मानली?**
(1) समाजाला सुमार्गातून परावृत्त करणे
(2) धर्मशाळा न बांधणे
(3) रंजल्यागांजल्याची सेवा करणे
(4) गावाची स्वच्छता न करणे

**खालील उतारा वाचून प्रश्न क्र. 121 ते 125 ची उत्तरे द्या.**

आपण झाडे कां पूजतो? अर्थात् इतर वस्तूंची पूजा करण्यास जी कारणे असतील तीच झाडांची पूजा करण्यासहि असली पाहिजेत. जो मनुष्य स्वतः पराक्रमी आहे, किंवा ज्याचा पराक्रमी पुरुषाशी कोणत्याही प्रकारचा संबंध आहे, अथवा ज्यापासून लोकांचे कोणत्याहि प्रकारचे मोठे हित होत आहे, अशा प्रकारच्या मनुष्याला बहुधा लोकांत मान मिळतो. हाच मान वाढला म्हणजे त्याला पूजा म्हणतात; व ही पूजा करण्याची बुद्धी आपल्या अंतकरणांत उत्पन्न झाली म्हणजे आपण तिला पूज्यबुद्धी म्हणतो. वड, पिंपळ, उंबर, आपटा शमी, तुळस, बेल वगैरे झाडांविषयी आमच्या मनांत जी पूज्यबुद्धी उत्पन्न झाली आहे ती वर थोडक्यात सांगितलेल्या कारणापैकी कोणत्या तरी कारणांनी उद्भवली असावी यात संशय नाही. जिरेनिअमप्रमाणे तुळशीत हवा स्वच्छ करण्याचा गुण फार आहे. म्हणून आम्ही सारे तिचे भक्त बनलो आहो किंवा. सर टी. माधव रावांनी एकदा सुचविल्याप्रमाणे बेल, तुळस आणि गवती चहा याचा चहा ऊर्फ गोडा काढा रोज सकाळी घेतल्यास वातपित्त कफाची विशेष बाधा न होता प्रकृति साफ राहण्यासारखे गुण तीत आहेत, म्हणून आम्ही तिला देवांच्या पूजेतील एक अत्यावश्यक द्रव्य केले आणि सर्व ऋतूत बायकांना तिच्याभोवती प्रदक्षिणा घालण्यास लाविले, हे निश्चयाने सांगता येत नाही ; तथापि एवढे खरे आहे की, ह्या झाडांच्या अंगच्या कसल्या तरी चांगल्या गुणाबद्दल त्याला आमच्या घरात व देवळात इतके महत्वाचे स्थान मिळाले असावे! वड, पिंपळ, उंबर वगैरे मोठ्या गर्द छायेची झाडे आहेत, आणि त्यांपासून पांथांस व इतरास मोठे सुख होते म्हणून त्यास देवत्व प्राप्त झाले असावे असे प्रथमदर्शनी वाटण्याचा संभव आहे. पण वास्तविक कारण तसे दिसत नाही, तसे असेल तर आंबा, बकुळ, फणस वगैरे दाट छायेची झाडे पूज्य का झाली नाहीत? आंबा व फणस छायेला चांगले असून खायलाही कांही वाईट नाहीत! तेव्हां फायद्याच्या दृष्टीने ही झाडे विशेष पूज्य व्हायला पाहिजे होती.

**121. तुळशीत हवा स्वच्छ करण्याचा गुण कशाप्रमाणे आहे?**
(1) झाडांप्रमाणे (2) फुलाप्रमाणे
(3) जिरेनिअमप्रमाणे (4) फळांप्रमाणे

**122. वातपित्त कफाची विशेष बाधा कशामुळे होत नाही?**
(1) बेल, तुळस आणि गवती चहा यांच्या काढयामुळे
(2) औषध उपचार घेतल्यामुळे
(3) सर्दी झाल्यामुळे
(4) ताप आल्यामुळे

**123. झाडांच्या कोणत्या गुणामुळे त्यांना देवळात स्थान मिळाले?**
(1) बऱ्या गुणांमुळे (2) चांगल्या गुणांमुळे
(3) वाईट गुणांमुळे (4) सद्‌गुणामुळे

**124. पूजा कशाला म्हणतात?**
(1) फुले, बेल वाहतो त्याला
(2) श्रद्धापूर्वक केलेले काम
(3) लोकांत मान वाढला म्हणजे त्याला
(4) नारळ वाढवून अगरबत्ती लावतो त्याला

**125. लोकात मान कोणाला मिळतो?**
(1) लोकांशी प्रेमळ वागणाऱ्याला
(2) लोकांशी रागाने वागणाऱ्याला
(3) सर्वात श्रीमंत असणाऱ्याला
(4) लोकांचे कोणत्याही प्रकारचे मोठे हित होत असेल तर

**खालील उतारा वाचून प्रश्नक्रमांक 126 ते 130 ची उत्तरे द्या.**

प्रतिभा दैवी वगैरे नसते, ती छान मानवीच असते. फक्त माणसे अपूर्व सुखाची फुलवण करणाऱ्या त्या यातनाघराकडे पाठ फिरवतात. दुःखाना घाबरतात, त्यामुळे अथांग सुखांना मुकतात. स्वतःचे काळीज ज्वाळेवर धरून पाहण्याची कल्पना करा. पण प्रथम काळजाला जखमा होतात. नंतर कधीही न कोमेजणारी या जखमांचीच फुले होतात. प्रतिभा प्रत्येकच व्यक्तीजवळ असते. तिला पैलू पाडता येतात. आपल्या वाट्याला आलेल्या काळाच्या पहाडात सुंदर लेणी खोदता येतात. फक्त वाईटाने आपले मन बेसुमार दुखले पाहिजे. चांगल्याची त्याला अनावर तहान लागली पाहिजे.

प्रतिभा या शब्दात दोन घटक आहेत. एक घटक आहे 'प्रति' हा आणि दुसरा आहे 'भा' हा. 'प्रति' म्हणजे दुसरा आणि 'भा' म्हणजे प्रकाश. दुसरा म्हणजे आहे त्याहून वेगळा. हा वेगळा प्रकाश निर्माण करणारी मनःशक्ती म्हणजे प्रतिभा. अनेक मनांमध्ये अंधारच आहे. अनेक जंगलांमध्ये अंधारच आहे. अनेक झोपड्यांमध्ये आणि घरांमध्ये अंधारच आहे. अनेक मुठींमध्ये अंधारच आहे. या सर्व अंधारांपर्यंत पोचणे सूर्याला शक्य होत नाही. ही सूर्याची फार मोठी उणीव होय. मानवी प्रतिभेला ही मर्यादा नाही. सूर्याचा प्रकाश जर जीवनातील हा अनंत अंधार नष्ट करू शकत नसेल तर तो अंधार नष्ट करण्यासाठी दुसरा आणि नवा उजेड निर्माण करण्याची गरज निर्माण होते. मानवी प्रतिभा हे कार्य करते.

**126. प्रतिभा म्हणजे काय?**
(1) घरातील अंधार
(2) वेगळा प्रकाश निर्माण करणारी मनःशक्ती

(3) मानवी मनातील अंधार
(4) मानवी जीवनातील अंधार

**127. चांगल्याची अनावर तहान कोणाला लागली पाहिजे?**
(1) असुराला (2) देवाला
(3) मानवी मनाला (4) अंधाराला

**128. जीवनातील अंधार कोण नष्ट करू शकते?**
(1) काजवा (2) सूर्याचा अस्त
(3) मानवी प्रतिभा (4) चंद्र

**129. या उताऱ्याला योग्य ते शीर्षक द्या.**
(1) अंधार (2) काळोख
(3) काजवा (4) मानवी प्रतिभा

**130. प्रतिभा कशी असते?**
(1) असुरवृत्तीची (2) अमानवी
(3) मानवी (4) दैवी

**131. Choose the correct alternative.**
**....... carefulness could have saved the situation.**
(1) A little (2) The little
(3) Little (4) Less

**132. Choose the correct alternative.**
**Bibliography is :**
(1) Knowledge of the Bible.
(2) List of books about the Bible.
(3) Characters from the Bible.
(4) List of books and writings of one author/ about one subject.

**133. In the armed forces, it is considered a great privilege to die in harness.**
**Choose the correct meaning of the idiom underlined in the above sentence.**
(1) die with honour
(2) die on a horse back
(3) die while still working
(4) die in the battle field

**134. Select the correct modal to express obligation.**
**You ........ keep your promise.**
(1) will (2) may
(3) would (4) should

**135. Which of the following sentences is correct?**
(a) He took out his shoes.
(b) He disposed off his car.
**Answer Option :**
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Neither (a) nor (b) (4) Both (a) and (b)

**136. Which one of the following sentences is correct ?**
(a) We should love the God.
(b) Many are Gods of Hinduism.
**Answer Option :**
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Neither (a) nor (b) (4) Both (a) and (b)

**137. Eagle flies highest of all the birds.**
**Choose the correct positive degree of the sentence**
(1) No other bird flies as high as eagle.
(2) Very few birds fly as high as eagle.
(3) Some other birds fly as high as eagle.
(4) Eagle flies higher than any other birds.

**138. Pick out the correct sentence from the given alternatives.**
(1) The fleet have set sail.
(2) John, as well as James, deserve praise.
(3) You, who is my friend, should not worry me.
(4) She is one of the best mothers that have ever lived.

**139. I know the owner who is a millionaire.**
**Identify the underlined clause.**
(1) Noun clause
(2) Relative clause
(3) Adverbial clause of manner
(4) Adverbial clause of place

**140. Which of the following sentences is correct?**
(a) Each of these boys plays games.
(b) The boy who does best he will get a prize.
**Answer Option :**
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Neither (a) nor (b) (4) Both (a) and (b)

**141. Identify the incorrect sentence from the following alternatives.**
(1) Bread and butter is a wholesome food.
(2) Two pounds of coffee costs seven and six pence.
(3) There are eggs and bacon for breakfast.
(4) John and Mary have gone for a holiday.

**142. The fog will disappear as soon as the sun rises.**
**Identify the type of the sentence.**
(1) simple
(2) complex
(3) compound
(4) complex - compound

**143. She was happy to come, ....... ?**
**Complete the sentence with the correct Question Tag.**
(1) was she (2) were she
(3) wasn't she (4) she was

The UNIQUE academy

**144. Many - a - hill ....... A crossed by the battalion. Choose the correct option to fill in the blank.**
(1) was (2) were
(3) may (4) none of these

**145. Complete the following sentence choosing the correct alternative.**
**If you feel that a habit is enslaving you, it should be ......**
(1) given in (2) given out
(3) given up (4) given away

**146. Choose the word nearest in meaning to the word underlined.**
**He is very meticulous in his dealings with others.**
(1) reserved (2) very careful
(3) indifferent (4) naughty

**147. Which of the following sentences is correct ?**
(a) We had a good play of football.
(b) He is my cousin brother.
**Answer Option :**
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Neither (a) nor (b) (4) Both (a) and (b)

**148. Choose the alternative and fill in the blank.**
**The ........ of the Gupta Kings is renowned for development in art and culture in Ancient India.**
(1) Rain (2) Reign (3) Rein (4) Regn.

**149. Pick out the odd pair from the given alternatives.**
(1) attract - attractive
(2) recruit - recruitment
(3) examine - examination
(4) advertise - advertisement

**150. Identify the word having the prefix that denotes the meaning 'across'.**
(1) multinational (2) inter-city
(3) transatlantic (4) outside

**151. Consider the following sentences :**
(a) What a fun ! (b) What fun!
(c) We had picnic. (d) We had a picnic.
**Which of the above sentences are correct?**
(1) (a) and (c) (2) (a) and (d)
(3) (b) and (c) (4) (b) and (d)

**152. Which one of the following sentences is correct?**
(1) He asked what we were doing.
(2) He asked that what are you doing.
(3) Ram said can he go home.
(4) He asked to Rama why your father is angry?

**153. Which of the following sentences is correct?**
(a) That is a good piece of advise.
(b) I advised him to take rest.
**Answer Option :**
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Neither (a) nor (b) (4) Both (a) and (b)

**154. Identify the sentence punctuated correctly.**
(1) milton, the great English poet was blind.
(2) Milton, the great, English poet was blind.
(3) Milton-the great English poet was blind.
(4) Milton, the great English poet, was blind.

**155. A person sitting ....... the back of the class tried to disrupt the lecture. Use the right preposition and fill in the blank.**
(1) at (2) in
(3) among (4) above

**156. Identify the sentence which does not follow the correct order of words.**
(1) The people rang the bell for joy.
(2) Nothing ever happens by chance.
(3) The tops of the mountains were covered with snow.
(4) In the village he died, where he was born.

**157. Everybody called it a lavish party.**
**Choose the correct antonym of the word underlined.**
(1) expensive (2) big
(3) frugal (4) wasteful

**158. Choose the correct phrase to complete the following sentence.**
**The news was ........ by word of mouth.**
(1) passed on (2) passed over
(3) passed out (4) passed off

**159. They sold their house because it was a real white elephant,**
**Which one of the following alternatives gives the correct meaning of the underlined phrase ?**
(1) a big one
(2) a rare find
(3) a huge and expensive one
(4) an expensive and useless one

**160. Choose the option that is a correct conversion of the following simple sentence into a complex sentence :**
**The report of his failure has surprised us all.**
(1) The report that he has failed has surprised us all.
(2) The report of his failing surprised us all.
(3) The report of his failure surprised us all.
(4) His failure report were surprised us all.

**161. Give a single word for :**
**Commencement of words with the same letter and/or sound.**

(1) repetition (2) alliteration
(3) assonance (4) imitation

**162. Everything has worked out according to the plan. Tick mark the correct meaning of the underlined phrase.**
(1) calculated (2) developed
(3) compiled (4) declared

**163. Which of the following sentences is incorrect?**
(1) He had leave of four days.
(2) He had four days' leave.
(3) He had leave for four days.
(4) None of the above.

**164. Lead is heavier than any other metal.**
**Choose the alternative with the positive degree.**
(1) No other metal is as heavy as lead.
(2) Lead is the heaviest metal than other.
(3) Lead is light metal than other.
(4) None of these.

**165. Choose the right alternative.**
**The man .......**
**I thought was thoroughly honest proved to be a swindler.**
(1) who (2) whom (3) what (4) that

**166. Which of the following sentences is correct?**
(a) He held the book in both hands.
(b) He held the book in both his hands.
**Answer Option :**
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Neither (a) nor (b) (4) Both (a) and (b)

**167. Mr. Mehta manages a big industrial empire.**
**Choose the correct alternative to change the voice**
(1) A big industrial empire is managed by Mr. Mehta.
(2) Mr. Mehta managing a big industrial empire.
(3) A big industrial empire was managed by Mr. Mehta.
(4) None of these.

**168. ....... hard we tried, we could not avoid the elections.**
**Choose the correct sentence connector to complete the sentence.**
(1) Although (2) Though
(3) However (4) Even if

**169. Choose the alternative which is a correct conversion of the following simple sentence into a compound sentence. In spite of being a Russian by birth, he speaks Hindi like his mother tongue.**
(1) He is a Russian by birth, but he speaks Hindi like his mother tongue.
(2) Though he is a Russian by birth he speaks Hindi like his mother tongue.
(3) He speaks Hindi like his mother tongue despite being a Russian by birth.
(4) None of these.

**170. I saw a bus leaving for vile Parle.**
**The underlined preposition indicates.**
(1) direction (2) request
(3) duration (4) Transportation

**171. Which of the following sentences has been written in the future perfect tense?**
(1) I shall have written my exercise by that time.
(2) I shall have been writing my exercise by that time.
(3) I shall write my exercise by that time.
(4) I had written my exercise by that time.

**172. The word immigrant means :**
(1) One who comes to a foreign land to settle there.
(2) One who leaves the foreign country and comes back to his own country.
(3) One who loves his country.
(4) The person who acts against his own country.

**173. Send your good wishes to all your friends.**
**Choose the correct alternative for changing the voice.**
(1) Good wishes were send to all your friends.
(2) All your friends sent good wishes.
(3) Let good wishes be sent to all your friends.
(4) None of these.

**174. You shall have a holiday tomorrow.**
**The modal expresses.**
(1) command (2) threat
(3) promise (4) duty

**175. If wishes horses, beggars them.**
**Complete the sentence choosing the correct alternative to show imaginary condition.**
(1) are - will ride
(2) were - would have ridden
(3) were - would ride
(4) were would rode

**176. The man with a smiling face is our leader.**
**Which is the correct conversion of the above sentence into the compound one?**
(1) The man has a smiling face and he is our leader.
(2) The man who has a smiling face is our leader.
(3) The man having a smiling face is our leader.
(4) As the man has a smiling face, he is our leader.

The UNIQUE academy

**177. Identify the sentence in which 'right' is used as an adverb.**

(1) Freedom is our birth - right.
(2) You did not make the right choice.
(3) You must right the wrongs done to her.
(4) It serves him right.

**178. Which of the following sentences is correct?**

(a) I left playing.
(b) Let go the horse's reins.

**Answer Option :**

(1) Only (a) (2) Only (b)
(3) Neither (a) nor (b) (4) Both (a) and (b)

**179. I had to shout in the mouth piece so that she could hear me.**
**Identify the underlined clause.**

(1) Adverb clause of reason
(2) Adverb clause of purpose
(3) Adverb clause of result
(4) Adverb clause of manner

**180. If we started now we would be in time.**
**The subjunctive in the sentence expresses.**

(1) improbability (2) preference
(3) intention (4) supposition

**181. The knowledge of the nuclear power might lead to annihilation of the human race.**
**The meaning of the underlined word is :**

(1) total destruction
(2) immortality
(3) tremendous progress
(4) full healthfulness

**182. I have read many novels.**
**The underlined word in the above sentence functions as**

(1) Adjective of Quantity
(2) Adjective of Number
(3) Demonstrative Adjective
(4) Emphasizing Adjective

**183. Choose the correct synonym of 'Omnipotent'.**

(1) All knowing (2) Ever lasting
(3) All powerful (4) Merciful

**184. Read the sentence carefully to find out if there is any grammatical error in it. If there is any error it will be only in one part of the sentence. The alphabet of that part is your answer.**
**(Ignore punctuation errors)**

**We will discuss/** (A) **about/** (B) **that matter later/** (C) **No error.** (D)

(1) A (2) B (3) C (4) D

**185. Which of the following sentences is correct?**

(1) He is worst than I.
(2) He gets a small salary.
(3) Of the two plans this is the best.
(4) Raipur is hot than Simla.

**Read the following passage carefully and answer the questions.**

It is said with truth that the function of a University is to prepare the youth to take their place in human society. It must provide its members with the knowledge and skill necessary to make them efficient citizens. But is the whole duty of man exhausted by the acquisition of knowledge and professional training ? Is a university only an institution for higher learning, a factory which churns out clerks and technicians able to run the machinery of the state? Mere knowledge which gratifies curiosity is different from culture which refines personality. Culture is not remembering a mass of serious details about the dates of birth of the great heroes of the world or the interesting names of the fastest ships which cross the Atlantic or entertaining odds and ends gathered from the latest who's who. A well-known institution of this country has for its motto Sa Vidya Ya Vimuchyate : that is knowledge which is designed for salvation, for the development of the soul, is the best. Such an idea is not merely an Indian idiosyncrasy. Plato said long ago that the culture of soul is "the first and fairest thing that the best of men can ever have." According to Goethe, the object of education is to form tastes and not simply to communicate knowledge. A man's culture is not to be judged by the amount of tabulated information which he has at his command, but by the quality of mind which he brings to bear on the facts of life. Education is not cramming the mind with a host of technical details, putting sight, as it were, into blind eyes. The eye of the soul is never blind, only to the false and fleeting. Too often the vision may be dragged downwards by the "leaden weights" of pride and prejudice, of passion and desire. The function of the teacher is not to add to the 'leaden weights' but remove them and liberate the soul from the encumbrance so that it may follow its native impulse to soar upwards.

**186. What is the true function of education according to the ancient Indian philosophers ?**

(1) Education is the development of mind.
(2) Education is the cultivation of culture.
(3) Education brings about salvation and development.
(4) Education aims at the inculcation of generosity.

the UNIQUE academy

**187. What is meant by 'leaden weights'?**

(1) Weights made of lead.
(2) Cold scientific knowledge.
(3) Social and family responsibilities.
(4) Hindering factors of pride and prejudice, passion and desire in the liberation of the soul.

**188. What is the objective of education according to Goethe?**

(1) It teaches social manners.
(2) It teaches courtesy.
(3) It forms tastes.
(4) It communicates knowledge.

**189. The function of a university is :**

(1) To enable the young to gather facts about the world.
(2) To learn to do his job.
(3) To enable them to earn their livelihood.
(4) To prepare the young to take their place in society.

**190. According to the passage, the function of the teacher is :**

(1) to foster the spirit of fellow - feeling.
(2) to teach him to master facts about the world.
(3) to remove the leaden weights of pride and prejudice, passion and desire to liberate the soul.
(4) to teach humanity and spirit of accommodation.

**Read the passage carefully and answer the questions given below it in the context of the passage.**

This, then, is held to be the duty of the man of wealth; first, to set an example of modest, unostentatious living, shunning display or extravagance; to provide moderately for the legitimhate wants of those dependent upon him; and after doing so to consider all surplus revenues which come to him simply as trust to administer in the manner which, in his judgement, is best calculated to produce the most beneficial results for the community-the man of wealth thus becoming the mere agent and trustee for his poorer brethren, bringing to their service his superior wisdom, experience, and ability to administer, doing for them better than they would or could do for themselves.

Those who would administer wisely must, indeed be wise, for one of the serious obstacles to the improvement of our race is indiscriminate charity. It were better for mankind that the millions of the rich were thrown into the sea than so spent as to encourage the slothful, the drunken, the unworthy. Of every thousand dollars spent in so - called charity today, it is probable that $ 950 is unwisely spent ; so spent, indeed, as to produce the very evils which it proposes to mitigate or cure

A well - known writer of philosophic books admitted the other day that he had given a quarter of a dollar to a man who approached him as he was coming to visit the house of his friend. He knew nothing of the habits of this beggar; knew not how it would be spent improperly. This man professed to be a disciple of Herbert Spencer; yet the quarter - dollar given that night will probably work more injury than, all the money which its thoughtless donor will ever be able to give in true charity will do good. He only gratified his own feelings, saved himself from annoyance-and this was probably one of the most selfish and very worst actions of his life, for in all respects he is most worthy.

In bestowing charity, the main consideration should be to help those who will help themselves; to provide part of the means by which those who desire to improve may do so; to give those who desire to rise the aids by which they may rise; to assist, but rarely or never to do all. Neither the individual nor the race is improved by alms - giving. Those worthy of assistance, except in rare cases, seldom require assistance. The really valuable men of the race never do, except in cases of accident or sudden change. Everyone has, of course, cases of individuals brought to his own knowledge where temporary assistance can do genuine good, and these he will not overlook.

**191. On the basis of the evidence present in the text the author seems to be :**

(1) a wealthy but unsympathetic man
(2) a man blind to other's needs
(3) a hypocritical person
(4) a wise, practical and unsentimental person

**192. The 'well known writer of philosophic books' gave a quarter of a dollar to the beggar out of**

(a) charity
(b) sheer thoughtlessness
(c) an urge for self - gratification
(d) regard for his teacher. Herbert Spencer.

**Pick out the correct alternative**

(1) (a) and (d) only (2) (a) and (b) only
(3) (c) and (d) only (4) (a), (b), (c) and (d)

**193. The word 'alms-giving' means :**

(1) immediate relief
(2) charitable relief
(3) charity without careful judgement
(4) rendering help to the needy

**194. The First paragraph**

(a) advocates the need to share wealth.
(b) warns against vulgar display of wealth.
(c) proves the intellectual superiority of the wealthy people.
(d) lists the duties of a wealthy man.

**Which of the statements given above is/are correct?**

(1) (a) and (c) only (2) (b) and (c) only
(3) (d) only (4) (c) and (d) only

**195. According to the author :**

(1) Charity should be selective.
(2) Charity always yields bad results.
(3) It is only the unworthy who benefit from charity.
(4) Giving charity indiscriminately is worse than not giving it.

**Read the passage carefully and answer the questions given below it in the context of the passage.**

Erosion in Nature is a beneficent process without which the world would have died long ago. The same process, accelerated by human mismanagement, has become one of the most vicious and destructive forces that has ever been released by man. What is usually known as 'geological erosion' or 'denudation' is a universal phenomenon which through thousands of years has carved the earth into its present shape. Denudation is an early and important process in soil formation, whereby the original rock material is continuously broken down and sorted out by wind and water until it becomes suitable for colonisation by plants. Plants, by the binding effects of their roots, by the protection they afford against rain and wind and by the fertility they impart to the soil, bring denudation almost to a standstill. Everybody must have compared the rugged and irregular shape of bare mountain peaks where denudation is still active with the smooth and harmonious curves of slopes that have long been protected by a mantle of vegetation. Nevertheless, some slight denudation is always occurring. As each superficial film of plant - covered soil becomes exhausted it is removed by rain or wind, to be deposited mainly in the rivers and sea, and a corresponding thin layer of new soil forms by slow weathering of the underlying rock. The earth is continuously discarding its old, worn-out skin and renewing its living sheath of soil from the dead rock beneath. In this way an equilibrium is reached between denudation and soil formation so that, unless the equilibrium is disturbed, a mature soil preserves a more or less constant depth and character indefinitely. The depth is sometimes only a few inches, occasionally several feet, but within it lies the whole capacity of the earth to produce life. Below that thin layer comprising the delicate organism known as soil is a planet as lifeless as the moon.

The equilibrium between denudation and soil formation is easily disturbed by the activities of man. Cultivation, deforestation or the destruction of natural vegetation by grazing or other means, unless carried out according to certain immutable conditions imposed by each region, may so accelerate denudation that the soil, which would normally be washed or blown away in a century, disappears within a year or even within a day. But no human ingenuity can accelerate the soil - renewing process from lifeless rock to an extent at all comparable to the acceleration of denudation.

This man-accelerated denudation is what is now known as soil erosion. It is the almost inevitable result of reducing below a certain limit the natural fertility of the soil-of man betraying his most sacred trust when he assumed dominion over the land ... That the ultimate consequence of unchecked soil erosion, when it sweeps over whole countries as it is doing today, must be national extinction is obvious, for whatever other essential raw material a nation may dispense with, it cannot exist without fertile soil.

**196. The author condemns :**

(1) man's dominion over the land.
(2) soil erosion.
(3) the betrayal of trust by man.
(4) the reduction of soil fertility.

**197. The word 'weathering in the phrase "slow weathering of the underlying rock' means.**

(1) action of the elements on exposed objects, especially rocks.
(2) change of weather.
(3) change of temperature.
(4) decay

**198. According to the author denudation**

(1) took place only in the beginning of the world's history.
(2) stops after a certain stage of historical development.
(3) is brought under control by plants.
(4) is completely checked by plants.

**199. The beginning of the passage implies that :**

(a) Nature is always good and kind.
(b) Man can never be his own friend.
(c) There is no other agency more destructive than man.
(d) Geological erosion has saved the world from dying.

**Which of the statements given above is/are correct?**

(1) (a) only (2) (a) and (c) only
(3) (b) only (4) (d) only

**200. Which could be the best title for the given passage?**

(1) Man's folly can cause complete destruction.
(2) Soil erosion-the threat to human survival.
(3) Equilibrium between denudation and soil formation is vital for our survival.
(4) Accelerated denudation : the primary cause of soil exhaustion.

# STI - मुख्य परीक्षा 2012 उत्तरे
## मराठी-इंग्रजी

| Ans | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 1 | 1 | 2 | 2 | 1 | 1 | 4 | 2 | 1 |
| 11 | 2 | 2 | 3 | 1 | 1 | 3 | 3 | 1 | 3 | 2 |
| 21 | 3 | 1 | 3 | 2 | 1 | 3 | 3 | 3 | 3 | 3 |
| 31 | # | 3 | 3 | 2 | 1 | 3 | 4 | 1 | 1 | 1 |
| 41 | 4 | 2 | 2 | 3 | 1 | 1 | 3 | 2 | 3 | 3 |
| 51 | 3 | 2 | 3 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 3 | # |
| 61 | 4 | 1 | 1 | 3 | 3 | 1 | 3 | 2 | 3 | 4 |
| 71 | 3 | 1 | 1 | 2 | 1 | 3 | 3 | 2 | 4 | 4 |
| 81 | 4 | 1 | 2 | 1 | 4 | 1 | 3 | 3 | 4 | 1 |
| 91 | 4 | 2 | 1 | # | 2 | 3 | 3 | 2 | 1 | # |
| 101 | 2 | 4 | 2 | 3 | 2 | 3 | 2 | 1 | 3 | 3 |
| 111 | 1 | 4 | 2 | 1 | 4 | 1 | 2 | 3 | 2 | 3 |
| 121 | 3 | 1 | 2 | 3 | 4 | 2 | 3 | 3 | 4 | 3 |
| 131 | 1 | 4 | 3 | 4 | 3 | 3 | 1 | 4 | 2 | 1 |
| 141 | 3 | 2 | 3 | 1 | 3 | 2 | 3 | 2 | 1 | 3 |
| 151 | 4 | 1 | 2 | 4 | 1 | 4 | 3 | 1 | 4 | 1 |
| 161 | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 4 | 1 | 3 | 1 | 1 |
| 171 | 1 | 1 | 4 | 3 | 3 | 1 | 4 | 2 | 2 | 4 |
| 181 | 1 | 2 | 3 | 2 | 2 | 3 | 4 | 3 | 4 | 3 |
| 191 | 4 | 4 | 4 | 3 | 4 | 3 | 1 | 3 | 4 | 3 |

# या चिन्हाने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.